**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे कथन**

**निशाणी क्र. ५५**

आरोपीचे नाव – विठ्ठल सावजी तुमसरे, वय– ५२ वर्षे,

व्यवसाय– मजुरी, राहणार – गोंडसावरी, ता. लाखनी, जि. भंडारा.

---

**प्र.क्र.१** – तुम्हाला सरकार पक्षाचा पुरावा समजला काय ?

**उत्तर** – होय.

**प्र.क्र.२** – तुम्हाला विचारण्यात येणा–या प्रश्नास तुम्ही उत्तर देणे बंधनकारक नाही याची जाणीव आहे का तुम्हाला ?

**उत्तर** – होय.

**प्र.क्र.३** – सरकारपक्षातर्फे **सा.क्र.१ सुनिल गजिराम तुमसरे** यांच्या कथनानुसार, ते तुम्हाला ओळखतात, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खरे आहे.

**प्र.क्र.४** – **सुनिल** यांच्या कथनानुसार, घटना दि.१५/०१/२०२१ रोजीची हनुमान मंदीराच्या बाजुला व गणेश तुमसरे यांच्या किराणा दुकानासमोर दोन ते अडीच च्या दरम्यान घडली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे. मी त्यादिवशी मामाच्या गावी होतो.

**प्र.क्र.५** – **सुनिल** यांच्या कथनानुसार, ते त्यावेळेस तेथे चेअरवर बसले होते, त्यांच्याबरोबर गावचा एक माणूस राघोजी तुमसरे हा बसला होता व तो गावच्या गोष्टी त्यांना सांगत होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.६** – **सुनिल** यांच्या कथनानुसार, त्यावेळी तुम्ही तिन्ही आरोपी गाडीने आलात आणि तुम्ही त्यांना सरळ मारायला सुरुवात केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.७ – सुनिल** यांच्या कथनानुसार, मोहनने मारायला सुरुवात केली, त्याच्या हातात लांबडा पेचकस होता, त्याने मारायला सुरुवात केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.८ – सुनिल** यांच्या कथनानुसार, मोहनने त्यांच्या डोक्याच्या उजव्या बाजुला मागे मारले, तसेच उजव्या डोळ्याला मारले, ते तेथे बेशुध्द पडले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.९– सुनिल** यांच्या कथनानुसार, तेवढ्यात त्यांची आई लिलाबाई गजिराम तुमसरे ही आली व म्हणाली 'माझ्या मुलाला कशाला मारले', तेव्हा त्यांच्या आईला सुध्दा शिविगाळ केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.१०– सुनिल** यांच्या कथनानुसार, विठ्ठल आणि विशाल यांनी त्यांना लाताबुक्क्यांनी मारले होते, त्यांच्या डाव्या हाताच्या कोहणीला लागले व दोन्ही बोटाच्या म्हणजेच आंगठ्यापासुन दुस-या व तिस-या बोटाच्या मध्ये लागले होते, त्यांना जखम झाली होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.११– सुनिल** यांच्या कथनानुसार, त्याच्या भावाने व आईने त्याला पोलीस ठाण्यात नेले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.१२– सुनिल** यांच्या कथनानुसार, त्याच्या भावाचे नाव अनिल होते, तो शेतावरुन येत होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – भावाचे नाव अनिल आहे, पण तो शेतावरुन येत नव्हता.

**प्र.क्र.१३– सुनिल** यांच्या कथनानुसार, पोलिसांनी त्याला सरळ मेडीकलला नेले, त्याच्या डोक्याला कम्पाउंडर यांनी मलमपट्टी केली, त्याला सरकारी दवाखान्यात नेले होते, त्याला गोळ्या दिल्या व सुई लावली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.१४– सुनिल** यांच्या कथनानुसार, १६ तारखेला त्याला भंडा-याला सरकारी दवाखान्यात नेले, एक्स-रे वगैरे काढला, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.१५– सुनिल** यांच्या कथनानुसार, त्याने १५ तारखेला रिपोर्ट दिली होती, नि.क्र.२८ वर रिपोर्ट असून त्यातील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.१६– सुनिल** यांच्या कथनानुसार, त्याला मोहन व विशाल धमक्या देत होते की, "तुला मारु, तुझे दिवस भोगत आले आहेत", याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.१७– सुनिल** यांच्या कथनानुसार, नि.क्र.२९ वर छापील एफ.आय.आर. असून त्यातील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.१८– सुनिल** यांच्या कथनानुसार, आर्टीकल-अ वरील मुद्देमाल पेचकस ही तीच पेचकस आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.१९**– सरकारपक्षातर्फे **सा.क्र.३ प्रमिला हेमराज हजारे** यांच्या कथनानुसार, घटना दि. १५/०१/२०२१ रोजीची आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२०– प्रमिला** यांच्या कथनानुसार, ती तेव्हा बांध्यावर जात होती, तिचा मुलगा करण हजारे हा एका मुलासोबत तिकडे दुसरीकडे गेला होता, ती बोलवायला जात होती, तेव्हा तुमची गणेश तुमसरे यांच्या दुकानासमोर मारापीटी सुरू होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२१– प्रमिला** यांच्या कथनानुसार, सुनिल तुमसरे याला मोहन, विठ्ठल आणि विक्की तुमसरे हे मारत होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२२– प्रमिला** यांच्या कथनानुसार, मोहनकडे पेचकस होता आणि विक्की हा लाथाबुक्क्यांनी मारत होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२३– प्रमिला** यांच्या कथनानुसार, मग सुनिलची आई आली, तिने 'माझ्या मुलाला का मारता' असे म्हणून ढकलाढुकल केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२४– प्रमिला** यांच्या कथनानुसार, ती नंतर तिच्या मुलाला घराकडे जा म्हणाली व ती बांध्यावर गेली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२५**– सरकारपक्षातर्फे **सा.क्र.४ लिला गजिराम तुमसरे** यांच्या कथनानुसार, घटना दि. १५ जानेवारीची आहे, वर्ष दोन वर्षापुर्वीची आहे, गणेश तुमसरे यांच्या दुकानासमोर घडली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२६– लिला** यांच्या कथनानुसार, ती मुलाला बोलवायला गेली होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.२७– लिला** यांच्या कथनानुसार, त्यांच्या मुलाला मोहन तुमसरे आणि विठ्ठल तुमसरे आणि विशाल यांनी मारले, मोहनच्या हातात पेचकस होता, लाथाबुक्क्यांनी मारत होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२८– लिला** यांच्या कथनानुसार, ती धावपळ करून मुलाला वाचवायला गेली, तिलासुध्दा ढकलाढुकल केली, तिच्या हातातील बांगड्या फुटल्या, मग सोडतच नव्हते, तिने कसेतरी त्याला घरी आणले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.२९**– **लिला** यांच्या कथनानुसार, तिचा मुलगा रक्ताने बंबाळ झाला होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.३०**– **लिला** यांच्या कथनानुसार, पोलिसांनी १७ तारखेला त्यांचे बयाण घरी येउन घेतले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.३१**– **लिला** यांच्या कथनानुसार, मोहन तुमसरे याने पेचकसने मारले होते, आर्टीकल–अ वरील मुद्देमाल हा तोच पेचकस आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.३२**– सरकारपक्षातर्फे **सा.क्र.५ दिगंबर राजेश्वरजी तलमले** यांच्या कथनानुसार, घटनेच्या वेळी ते पोलीस स्टेशन लाखनी येथे पोलीस हेडकॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असतांना दि. १५/०१/२०२१ रोजी पोलीस ठाणे लाखनी येथे दाखल अप.क्र.१०/२०२१ कलम ३२४,५०४,५०६ सह ३४ भा.दं.वी. गुन्ह्याचा पुढील तपास करण्याकामी ठाणेदार यांनी आदेश केला, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.३३**– **दिगंबर** यांच्या कथनानुसार, या गुन्ह्याचा तपास करण्याकरिता दि. १६/०१/२०२१ रोजी ते गोंडसावरी येथे गेले, जखमी फिर्यादी यांना विचारपूस केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.३४**– **दिगंबर** यांच्या कथनानुसार, दोन पंचांना नि.क्र.४० वरील सुचनापत्र दिले व त्यातील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.३५**– **दिगंबर** यांच्या कथनानुसार, जखमी फिर्यादीने घटनास्थळ दाखविले, दोन्ही पंचांसमक्ष दिसत्या परिस्थितीचा नि.क्र.४१ वरील घटनास्थळ पंचनामा केला व त्यातील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.३६– दिगंबर** यांच्या कथनानुसार, त्या पंचांसमक्ष आरोपींनी गुन्ह्यात वापरलेले पेचकस जप्त करण्यात आले, नि.क्र.४२ वर जप्तीपत्रक असून त्यातील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.३७– दिगंबर** यांच्या कथनानुसार, पेचकस ताब्यात घेण्यात आला, त्यावर त्यांच्या व पंचांच्या सह्या असलेले कागदी लेबल लावले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.३८– दिगंबर** यांच्या कथनानुसार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, जखमी फिर्यादी यांचे गुन्ह्या संदर्भाने सविस्तर बयाण नोंदविले, पोलीस ठाण्यात परत येउन पेचकस हेडमोरर् यांच्या ताब्यात दिला, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.३९– दिगंबर** यांच्या कथनानुसार, जखमी यांचे तपासणी करणारे वैद्यकीय अधिकारी यांना पेचकसबाबत क्युरी करण्यात आली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.४०– दिगंबर** यांच्या कथनानुसार, नि.क्र.४३ वर क्वेरी पत्र असून त्यातील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.४१– दिगंबर** यांच्या कथनानुसार, तुम्ही जखमीस पेचकसने मारून जखमी केले व शिविगाळ करून धमकी दिली असे त्यांच्या तपासात निष्पन्न झाले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.४२– दिगंबर** यांच्या कथनानुसार, त्यांनी पंच निखील यांना नि.क्र.४० वरील सुचनापत्र दिले होते व त्यावर त्यांची सही आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.४३– दिगंबर** यांच्या कथनानुसार, आर्टीकल–अ वरील तोच पेचकस असून त्यावर त्यांची, पंचांची व आरोपी मोहन तुमसरे यांची सही आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.४४–** सरकारपक्षातर्फे **सा.क्र.६ डॉ. अमितकुमार दिलीपकुमार मेश्राम** यांच्या कथनानुसार, दि. १५/०१/२०२१ रोजी ४.३० वाजताच्या सुमारास पोलिस हवालदार भालेराव यांनी सुनिल तुमसरे यांना तपासणीकरिता मुलाहिजा फॉर्मसह त्यांच्याकडे आणले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.४५– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, त्याला दोन जखमा होत्या, त्यांनी त्याला प्राथमिक उपचार दिला, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.४६– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, त्याच्या उजव्या बाजुच्या कपाळावर ०.५ से.मी. ची एल.सी.डब्ल्यु ची जखम होती व डाव्या हाताच्या अंगठीचे बोट व लहान बोट यांच्यामध्ये ०.५ से.मी. एल.सी.डल्ब्यु ची जखम होती, या दोन्ही जखमा कठीण व बोथड वस्तुने झाल्या होत्या व दुरूस्तीचा कालावधी ०७ दिवसांचा होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.४७– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, जखमीच्या छातीला मार लागला होता त्यामुळे त्याची छाती दुखत होती, म्हणून त्यांनी जखमीस छाती परिक्षणासाठी भंडारा येथे पाठविले व फिजिशियनकडे तपासणीसाठी पाठविले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही. आम्ही मारलेच नव्हते.

**प्र.क्र.४८– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, त्यानुसार त्यांनी नि.क्र.४६ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र दिले व त्यामधील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.४९– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, पोलिसांनी एक हत्यार क्वेरीकरिता त्यांच्याकडे पत्रासह आणले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.५०– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, नि.क्र.४७ वरील त्यांनी त्यांचा क्वेरी अहवाल दिला व त्यामधील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.५१– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, रिपोर्टमध्ये वर्णन केलेल्या हत्याराने त्या जखमा होऊ शकतात, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.५२– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, आर्टीकल–अ वरील हत्यार हा तोच हत्यार आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.५३– डॉ. अमितकुमार** यांच्या कथनानुसार, त्यांचे हस्ताक्षर असलेल्या लेबलने ते हत्यार सिलबंद केले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.५४**– सरकारपक्षातर्फे **सा.क्र.७ चुनरिया रामानंद भुरे** यांच्या कथनानुसार, दि. १५/०१/२०२१ रोजी त्यांची ड्युटी पोलीस ठाणे लाखनी येथे १४.०० ते २०.०० या काळात स्टेशन डायरी अंमलदार म्हणून असतांना त्यादिवशी दुपारी १६.०० च्या दरम्यान सुनिल गजिराम तुमसरे वय ४५ वर्षे, रा. गोंडसावरी हे पोलीस ठाणे लाखनी येथे फिर्याद देण्याकरीता आले होते, त्यांच्यासोबत त्यांचे भाऊ अनिल तुमसरे हे देखील होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही.

**प्र.क्र.५५– चुनरिया** यांच्या कथनानुसार, त्यावेळेस त्यांच्या डोक्याला उजव्या बाजुला लागले होते व रक्त निघत होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे माहिती नाही. आम्ही त्याला पाहिले नव्हते.

**प्र.क्र.५६**– **चुनरिया** यांच्या कथनानुसार, त्यामुळे त्यांनी मुलाहिजा फॉर्म तयार केला, मग त्यांनी पोलीस ठाण्यात हजर असलेले पोलीस धनराज भालेराव यांच्यासह फिर्यादी सुनिल तुमसरे यांना लाखनी रुग्णालयात एम.एल.सी. करीता पाठविले, तेथे त्यांनी एम.एल.सी. करून आणली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे. आम्हाला त्याविषयी एवढे माहिती नाही.

**प्र.क्र.५७**– **चुनरिया** यांच्या कथनानुसार, त्यानंतर फिर्यादी सुनिल गजिराम तुमसरे यांची फिर्याद घेऊन त्यावेळी डि.ओ. म्हणून असलेले राजपूत मते यांच्या आदेशाने एम.एल.सी. आणि फिर्यादनुसार त्यांनी गुन्हा नोंद करून घेतला, तो गुन्हा फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे व डि.ओ. अधिकारी यांना फिर्याद दाखविल्यानंतर नोंद केला, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे आम्हाला माहिती नाही.

**प्र.क्र.५८**– **चुनरिया** यांच्या कथनानुसार, नि.क्र.५१ वरील मुलाहिजा फॉर्म वर त्यांची सही आहे, त्यामध्ये कॉम्पी पेस्ट करतांना चुकुन तिघांनी काठीने डोक्यावर मारपीट केली असे लिहिले गेले, एवढे वगळून उर्वरीत मजकूर बरोबर आहे, त्यांना लागल्यामुळे व रक्त निघत असल्यामुळे त्यांना प्रथम उपचार देणे आवश्यक होते, त्यामुळे घाईगडबडीत असे लिहिले गेले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.५९**– **चुनरिया** यांच्या कथनानुसार, नि.क्र.२८ वरील तोंडी रिपोर्ट वर त्यांची सही आहे व डि.ओ. यांचा आदेशही आहे, त्यातील मजकूर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे, त्यावर फिर्यादीची सही देखील आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.६०**– **चुनरिया** यांच्या कथनानुसार, नि.क्र.२९ वरील छापील एफ.आय.आर. मधील मजकूर बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर** – हे खोटे आहे.

**प्र.क्र.६१**– तुमच्याविरुध्द साक्षीदार साक्ष का देतात?

**उत्तर** – ते सर्व खोटे आहेत. त्यांचे व आमचे पटत नसल्याने ही खोटी केस केली.

**प्र.क्र.६२**– तुम्हाला कोणता पुरावा द्यायचा आहे किंवा स्वतःला अथवा साक्षीदाराला तपासावयाचे आहे काय?

**उत्तर** – नाही.

**प्र.क्र.६३**– तुम्हाला या खटल्याबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे काय?

**उत्तर** – मी त्या ठिकाणी नव्हतो.

समक्ष,

स्वा/– स्वा/–

(आरोपीची सही) (रा.सु. धडके)

दिनांकः– २२/०१/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लाखनी

**<u>प्र मा ण प त्र</u>**

असे प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा जबाब माझे समक्ष नोंदविण्यात आला असून त्यातील मजकूर त्यांच्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

स्वा/–

(रा.सु. धडके)

दिनांकः– २२/०१/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, लाखनी